मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हा व सत्र न्यायालय, सांगली येथे भरणा केलेली रु.२५,०००/- इतकी रक्कम श्री.एस. आर. विश्वासराव, मोटार वाहन निरीक्षक यांना अदा करण्यास मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः याचिका-१०१२/प्र.क्र.१२८/परि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : २ मे २०१९

<u>वाचा :-</u>

१) **सिव्हील अपिल क्र.१६८०/२०१९ (स्पेशल लिव्ह पिटीशन (सी) क्र.२३८४४/२०१८) प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१५.०२.२०१९ रोजी दिलेले आदेश**
२) **परिवहन उप आयुक्त (निरीक्षण), परिवहन आयुक्त कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्र.पआका/सावळी न्यायालयीन प्रकरण/का१०/२०१४/जा.क्र.३५०३, दि.१६.०३.२०१९**
३) **उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सांगली यांचे पत्र क्र. जा. क्र.१५१८/आस्था/उपप्रापअ/ सांगली/ २०१९, दि.१३.०३.२०१९**

<u>**प्रस्तावना :-**</u>

मौजे सावळी जि. सांगली येथील गट क्र.१२६/१ मधील ४ हेक्टर जागा जिल्हाधिकारी सांगली यांनी दि.२३.०७.१९९९ च्या आदेशान्वये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सांगली यांना हस्तांतरीत केली असून सदर जागेची नोंद उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सांगली यांच्या नावे ७/१२ व इतर अभिलेख्यात झाली आहे.

श्री. शंकर मायाप्पा कांबळे रा. सावळी ता. मिरज जि. सांगली यांनी मौजे सावळी येथील गट क्र.१२६/१ मधील १० हेक्टर ६९ आर पैकी ६ हेक्टर ४९ आर एवढ्या मिळकतीचा कब्जा मिळण्याकरीता देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर व महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी सांगली यांचे विरुद्ध नगर दिवाणी न्यायालयात रे. दि. मु. नं. ३२१/९४ दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल दि.३०.०८.२००६ रोजी वादी श्री. शंकर मायाप्पा कांबळे यांच्या बाजूने लागला असून सदर आदेशाविरुद्ध उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे वतीने जिल्हा न्यायालय सांगली येथे किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९८/२००८ दाखल करण्यात आला होता. तथापि, रे. दि. मु. नं. ३२१/९४ या प्रकरणामध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सांगली हे प्रतिवादी नसल्याने त्यांना अपिल दाखल करता येणार नाही असे नमूद करुन दि.११.०६.२०१२ च्या आदेशान्वये सदर अपिल अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळला आहे. जिल्हा न्यायालयाच्या दि.११.०६.२०१२ च्या आदेशाविरुद्ध विधि व न्याय विभागाच्या मान्यतेने मा. उच्च न्यायालयात अपिल दाखल करण्यासाठी गेले असता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली हे थर्ड पार्टी असल्याने त्यांना अपिल दाखल करता येणार नाही

असे सांगण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी, सांगली यांनी मा. उच्च न्यायालय,मुंबई येथे रिट पिटीशन क्र.५८५४/२०१३ दाखल केली. सदर रिट याचिका क्र.५८५४/२०१३ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.१४.०३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये Delay Condonation याचिका नामंजूर केली.

रिट याचिका क्र.५८५४/२०१३ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध जिल्हाधिकारी सांगली यांचेवतीने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली यांनी मा. सर्वोच्च न्यायालय येथे स्पेशल लिव्ह पिटिशन क्र.२३८४४/२०१८ (सिव्हील अपिल क्र.१६८०/२०१९) दाखल केली आहे. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करण्यास झालेला विलंब हा "प्रतिवादी क्र.१ ते ९ यांना रु.२५,०००/- इतकी रक्कम आदेशाच्या दिनांकाच्या आठ दिवसात अदा करण्याच्या अधिन राहून क्षमापीत (Delay Condone) करण्यात येत आहे" असे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१५.०२.२०१९ रोजी दिले आहेत. सदर आदेशाचे अनुपालन कालमर्यादेत करणे आवश्यक असल्याने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली या कार्यालयातील श्री. एस. आर. विश्वासराव, मोटार वाहन निरीक्षक यांनी स्वतः शासनाच्यावतीने जिल्हा व सत्र न्यायालय, सांगली येथे रु.२५,०००/- इतक्या रकमेचा भरणा केला आहे. त्यामुळे सदर रकमेची श्री. एस. आर. विश्वासराव, मोटार वाहन निरीक्षक यांना प्रतिपूर्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय: -</u>

सिव्हील अपिल क्र.१६८०/२०१९ प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हा व सत्र न्यायालय, सांगली येथे शासनाच्यावतीने भरणा केलेल्या रु.२५,०००/- इतकी रकमेची प्रतिपूर्ती श्री.एस. आर. विश्वासराव, मोटार वाहन निरीक्षक यांना करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. यासाठी येणारा खर्च हा "०८५८- निलंबन लेखा" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. सदरहू शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग चार, अनुक्रमांक ५ अन्वये प्रशासनिक विभागास असलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०२१२२४३०५५२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KADAM DATTATRAY HANMANT

Digitally signed by KADAM DATTATRAY HANMANT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=cf316337e92d3c54da432222208093bfc6ed1d1570f094663515273d0b4d27fc, postalCode=400032, street=HOME DEP.MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a923979cf886d5724fbed87cd57745c3f72eba57b0d277f11e970f0aaca99802, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KADAM DATTATRAY HANMANT
Date: 2019.05.02 12:39:16 +05'30'

(द.ह.कदम)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव

२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव

३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव

४. महालेखापाल (लेखापरीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

६. परिवहन उप आयुक्त (निरीक्षण/लेखा) परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई

७. प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कोल्हापूर

८. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सांगली

९. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली

१०. अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

११. निवड नस्ती (परिवहन-४).